ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR


MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Issue-17, Vol-05, Jan. to Mar.2017

Editor
Dr.Bapu G. Gholap



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



14) A feminist Perspective In the Novels of D.H. Lawrence's And Anita Desai
Sapna, Ferozepur || 56

15) God Made Me Special: A Case Study of Two Autistic Kids
Anuja Singh || 58

16) Discrimination of Class and Gender: Mahesh Dattani's Tara
Dr. Garima Chhabra, Indore || 61

17) SOLID WASTE MANAGEMENT SYSTEMS – AS A PART OF ECONOMIC DEVELOPMENT
Dr. Ashish Mehta, Indore || 64

18) Role of IT on House-Keeping Operations in Library
Dr. Anil Kumar Singh, Gonda || 68

*19)* CONCEPT OF GOD IN CHRISTIANITY
ABDUL ALIM SEIKH, W.B. || 71

20) The Three Qualities of Material Nature
Dr. Rinku Guin, Dhenkanal ,Odisha. || 75

21) मातामाय व मरीमाय: एक आकलन
प्रा.डॉ.शरद जानराव वाघोळे,मंगरूळपीर जि.वाशीम || 83

22) महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथांची .....
डॉ. प्रा. रश्मी शामसुंदर बकाने, ता.किनवट || 87

23) भारतातील दहशतवाद : भारताची अंतर्गत सुरक्षितता आणि उपाययोजना
प्रा. दिपकराव बी. देवरे, जि. जळगांव || 89

24) प्रादेशीकवाद - भारतीय अंतर्गत सुरक्षेस आव्हान
प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके, जि. धुळे || 91

25) आदिवासी समुदायाचे आर्थिक जीवन : संक्षिप्त आढावा
प्रा. तुळसीदास फकीरजी काळे, पाथरी || 93

26) जालना जिल्हा २०१४ विधानसभा निवडणूक विश्लेषण
डॉ. बळीराम दत्तात्रय कटारे, जालना || 96

27) भारतीय लोकशाही व महिला सबलीकरण
प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव, देगलूर || 98

http://www.vidyawarta.blogspot.com | https://sites.google.com/site/vidyawartajournal



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

27

# भारतीय लोकशाही व महिला सबलीकरण

प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय, देगलूर

*********

**Key Words.** लोकशाही, महिला सबलीकरण, राज्यघटना, निवडणूका, राजकीय पक्ष

**Abstract :**

बऱ्याच दिवसांपासून भारतीय लोकशाहीने महिला सबलीकरणासाठी काय केले ? काय केले नाही ? या विषयी लिहिण्याची इच्छा होती. जी या लेखातून पूर्ण होताना आनंद होत आहे. भारतीय लोकशाहीचा महिला हा एक महत्वाचा भाग आहे. या भागापर्यंत भारतीय लोकशाही किती प्रमाणात पोहोचली ? त्यासाठी शासनाने काय केले ? हे जाणण्याच्या हेतूने ही मांडणी केली. जगातील इतर देशाचा विचार करता भारताने स्वातंत्र्यापासूनच संविधानातून महिला सबलीकरणास प्राधान्य दिले. तरीही मागील ७० वर्षांत त्यास समाधानकारक रुप आले नाही असे म्हणणाऱ्याचे प्रमाण तुलनेने अधिक आहे. परंतू याठिकाणी आपण एक बाब विसरतो की, भारतासारख्या पितृसत्ताक व सरंजामी समाज व्यवस्थेत व धर्म आणि जातीच्या प्रभावाने त्रस्त समाजव्यवस्थेत महिलांविषयीची झालेली प्रगती समाधानकारक आहे, हे गृहितक मनात ठेवून चिंतन व मांडणी केली. महिला सबलीकरण व लोकशाही यांचे नातेसंबंध फारच निकटचे आहे. या नात्याला जर समाजाने एकमुखाने साथ दिली तर भारतीय समाज व राज्यव्यवस्था शाश्वत विकास व अहिंसावादी राजकारण व समाजकारणाला मूर्तरूप दिल्याशिवाय राहणार नाही. असा या दोन्हींत असणारा सहसंबंध व्यक्त करण्यासाठीचा हा प्रयत्न आहे. एखाद्या विषयावर चिंतन करून त्यास लेखनबध्द करण्यासाठी काही साधनांचा आधार लागतो. याठिकाणी महिला सबलीकरणासाठी शासनाने केलेल्या योजना व विधेयकांना आधारभूत मानले. पण त्याहीपेक्षा महिला सबलीकरणाविषयी भारतीय राजकारण व समाजकारणात अनेक बोलक्या प्रसंग व व्यक्त होणाऱ्या मनाचा आधार घेतला. या सर्वांचा आधार घेवून अनुभववादी व ऐतिहासिक अभ्यास पध्दतींच्या मदतीने विश्लेषण केले.

प्रस्तावना : लोकशाही व महिला सबलीकरणाचा फार जवळचा संबंध आहे. महिला सबलीकरणास पोषक शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही. लोकशाही हे साधन तर महिला सबलीकरण साध्य आहे. १७९२ साली मेरी वुलस्टन काप्ट यांची ए विन्डीकेशन ऑफ राइट्स ऑफ वुमेन पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाने जागतिक स्तरावर प्रथमच महिला सबलीकरणाच्या चिंतनाची पार्श्वभुमी तयार केली. या पुस्तकात काफ्टनी फ्रान्स क्रांतीतून उदयास आलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांना महिला समाजासाठी लागू करण्याची मागणी केली. जोपर्यंत महिलांना समान संधी, अधिकार व सुरक्षितता प्राप्त होत नाही. तोपर्यंत कोणत्याही समाजाला समतावादी समाज म्हणता येणार नाही. त्यानंतर जे.एस.मिलने ए सब्जेक्शन ऑफ वुमेन आणि ऑन लिबर्टी या ग्रंथातून महिला स्वातंत्र्य व मुक्तीचे समर्थन केले. अमेरिकेतील कनाराजेटकीन या समाजवादी व्यवस्थेच्या स्थापनेतून महिला मुक्तीला मुर्तरुप देता येते. अशाप्रकारचे स्वप्न पाहत असत त्यांनीच १९१० सालच्या काम करणाऱ्या महिलांच्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय संम्मेलनात ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला. १९२० ला इंग्लंडमध्ये स्त्री चळवळीचा प्रारंभ प्रसिध्द तत्वज्ञ मैक्सशीलच्या नेतृत्वाने झाला. स्त्रीयांनाही पुरुषांप्रमाणे समान अधिकार मिळावेत. या मुद्यातूनच लैंगिक समानतेत मुलभूत क्रांतीकारी बदल झाला. दुसऱ्या महायुध्दानंतर १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघाच्या चार्टरमध्ये लैंगिक समतेला मानवी हक्कांत समाविष्ट करुन महिला सबलीकरणास आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून दिली. १९४८ च्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेतील घोषणेत मानवी हक्क, मानवी सभ्यता व प्रतिष्ठेच्या सन्मानास स्वातंत्र्य, न्याय व शांततेचा मुलभुत आधार मानले. या काळापासूनच आंतरराष्ट्रीय संम्मेलन आयोजित होवू लागले. तर दुसऱ्या बाजूने या संघटनामार्फत शैक्षणिक व राजकीय समतेस पोषक जागतिक लोकमत तयार करण्याचे प्रयत्न होवू लागले. परिणामतः मानवी हक्कास नाकारणाऱ्या राजेशाही, सरंजामशाही, वसाहतवादी व अधिनायकवादी इ. शासन प्रणालीचे पतन होवू लागले. तर त्या ठिकाणी मानवी हक्कास संरक्षण देणाऱ्या लोकशाही शासन व्यवस्थेची स्थापना होवू लागली. परंतू या सर्व शासन व्यवस्थेत स्वतंत्रपणे महिलांची गुलामी व शोषण समाप्त करण्याच्या दिशेने कोणतेही प्रयत्न होत नसत. तर महिला समाजाचे शोषण व गुलामीच्या अंतातच मानवी हक्काची यशस्विता आहे.

१९४० साली सायमन दी बुआ यांनी द सेकेंड सेक्स या ग्रंथात स्त्री स्वातंत्र्याचे समर्थन केले. त्यांनी आपल्या ग्रंथात स्पष्ट केले की, स्त्रियांचे शोषण इतिहास आणि संस्कृतीच्या उत्पत्तीची आहे.



Scanned by CamScanner

त्यास नैसर्गिक प्रक्रिया समजता येणार नाही. स्त्रिया जन्मास येत नाहीत तर बनवल्या जातात. १९७० साली एस.फायरस्टोन यांचा ग्रंथ द डायलेक्टिक्स ऑफ सेक्स, के.मिचेलचा ग्रंथ वुमेन : द लाँगेस्ट रिवोलुशन या ग्रंथांनी स्त्री-पुरुष समतेचे महत्त्व व अनिवार्यतेकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अंतिमत: हा प्रवास अनेक उदारमतवादी, मार्क्सवादी व उत्तर आधुनिकतावादी संकल्पनांतून महिला सबलीकरण संकल्पनेच्या रुपात प्रकट झाला.

भारतीय लोकशाहीत महिला सबलीकरणाची प्रक्रिया स्पष्टपणे समजून घेण्यासाठी महिला सबलीकरणात समाविष्ट असलेल्या स्त्रियांच्या गुलामीच्या ऐतिहासिक प्रक्रियेस समजून घेवून त्याचे विश्लेषण करावे लागेल. कारण भारतातील महिला सबलीकरणाची प्रक्रिया पश्चिमेकडील व पूर्वेकडील इतर राष्ट्रांच्या महिला सबलीकरण प्रक्रियेपासून पूर्णत: वेगळी आहे. पश्चिमेकडील देशांचे महिला सबलीकरणाचे प्रश्न व संघर्ष मताधिकारापर्यंतच मर्यादित आहे. तर भारतातील महिला सबलीकरणाचा संघर्ष पितृसत्ताक व सामाजिक वाईट रुढी-परंपरेच्या मुक्तीचा संघर्ष आहे. पश्चिमेकडील महिला समुहाच्या संघर्षाचे प्रेरणा-स्त्रोत फ्रांन्स क्रांतीतील स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही मुल्य आहेत. तर भारतातील महिला सबलीकरणाचा लढा पुरुषांवरील भक्ति, श्रध्दा व पतिव्रता इ. धार्मिक मर्यादांनी ग्रासला आहे. पश्चिमी देशांतील स्त्री संघर्षात जातिवाद उच्च, नीच, शुध्दता-अशुध्दता इ. भावनांचा अभाव आहे. तर भारतातील स्त्री समाजाचा संघर्ष जातिवादी, सवर्ण-क्षुद्र, पवित्र-अपवित्र इ. विचाराने प्रभावी आहे. राहूल सांकृतायनने प्रारंभिक समाजातील महिलांचा स्थितीविषयीचे वर्णन करताना लिहिले की, आर्य भारतात येण्यापूर्वी भारतातील मुलनिवासी अनार्य महिलांच्या अति सन्मान करत. त्यांची सामाजिक स्थिती सुदृढ होती. मातृसत्ताक कुटूंब व्यवस्था होती. त्यामुळे कुटूंब व समाजात महिलांचे स्थान सन्मानजनक व महत्वाचे होते. प्रत्येक कुटूंबाची प्रमुख महिलाच असत. समाजात स्त्रीचे नेतृत्व होते. वैदिक युगपूर्वकाळात अविवाहित मुलींना शिक्षण आणि ज्ञानाच्या विभिन्न शाखाचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होती. विधवा सोबत कुटूंबात सन्मानजक व्यवहार होत असत. बालविवाह व पडदा पध्दती नव्हती. विदुषी महिलांना सामाजिक दरबारात व कार्यात जाण्याचे स्वातंत्र्य होते. खेमा, सुभद्रा, जातक, अमरा, जयंती, सुमेधा, अनुपमा इ. प्रसिध्द विदुषी महिला होत्या. पूर्व वैदिक काळात अनेक जनपदात महिलांच्या नावाने अनेक राज्य व नगर होते. उदा. चंपा, काशी, कौशाम्बी, वैशाली, गांधार, वज्जी, महिष्मति, शिवी ई. जम्बुद्वीपाच्या अनेक राज्यांची स्थापना महिलाद्वारे करण्यात आली. ज्याचा स्पष्ट उल्लेख पंचतंत्रात मिळतो. बौध्द ग्रंथातून काव्यांची निर्मिती करण्याच्या महिलांचा स्पष्ट उल्लेख सापडतो.

विज्ञानेश्वरामार्फत रचण्यात आलेल्या मिताक्षरानूसार पतिच्या संपत्तीत संयुक्तरित्या महिला उत्तराधिकारी असत. वैदिक युगातही महिलांना वंदनीय मानले जात असत. या युगात महिलांना कुलदेवी मानले जात. स्त्रिया गृहस्वामिनी असत परंतू त्यांचे कार्यक्षेत्र घरापर्यंतच मर्यादित नव्हते. विशेषत: क्षत्रीय कुळात जन्मलेल्या महिलांना युध्दात सारथ्य करण्याचा अधिकार प्राप्त होता. धर्मसुत्र आणि स्मृतिंच्या युगात महिलांचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होवू लागले. स्त्रीयांसोबत भोजन करणाऱ्यास घृणा व हीन नजरेने पाहू लागले. स्त्रीने घरातून कुणालाही न सांगता पडदा न ओढता बाहेर पडु नये. अति जलद चालू नये. दुकानदार, संन्यासी, वृध्द, वैद्य याशिवाय इतर कोणत्याही पुरुषासोबत बोलू नये. आपल्या नाभिस खुले ठेवू नये, पूर्ण अंग झाकेल असेच कपडे घालावे. पती किंवा संबंधित व्यक्तीची घृणा करु नये. मुलींच्या तुलनेत मुलांची अधिक काळजी घेतली जात. पतीच्या आदेशाचे पालन करणे व त्यास देवता समजून पूजा व सन्मान देणे हे स्त्रीचे आद्यकर्तव्य मानले पाहिजे. पत्नीचे कर्तव्य आहे की भांडे घासणे, धुणे धुणे, घरातील टेबल, खुर्ची ई. साहित्यास साफ करुन योग्य ठिकाणी ठेवणे. पतिच्या इच्छेनूसार काम करणे. सासु-सासऱ्याचे पाय दाबणे ई. पती हाच स्त्रीचा गुरु असतो. पतीचे घरच तिच्यासाठी पाठशाला असते. या पाठशाळा घरातील काम हेच अभ्यासाचे विषय असतात.

महात्मा गौतम बुध्दाने स्थापन केलेल्या बौध्द धर्मात स्वातंत्र्य, समता व बंधुतेला अधिक महत्व आहे. त्यांनी आपला शिष्य आनंदच्या सांगण्यावरुन स्त्रियांना भिक्कु संघ व विहारात प्रवेश दिला. ज्यामुळे स्त्रीयांना समाजात पुरुषांच्या समान स्थान मिळाले. घरातून बाहेर निघून मोकळ्या वातावरणात श्वास घेण्यास परवानगी मिळाली. जाती व्यवस्था, पवित्र-अपवित्र, कर्मकांड, अंधश्रध्दांना विरोध करुन एका मानवतावादी युगाचा प्रारंभ केला व त्यातुन एका सामाजिक क्रांतीचा उदय झाला.

बुध्दानंतर मध्ययुगापर्यंत विशेषत: दक्षिणेकडे महात्मा बसवण्णांचा उदय होईपर्यंतचा काळ मनुवादी व्यवस्थेच्या वर्चस्वाचा काळ होता. ज्यास बुध्दानंतर सम्राट अशोकाने समतावादी व्यवस्थेत रुपांतरीत करण्याचा प्रयत्न केला. मध्ययुग हे वैदिक व मनुस्मृतीने भारलेले होते. अशा काळात महात्मा बसवेश्वरांनी वयाच्या आठव्या वर्षापासूनच स्त्री मुक्तीच्या आंदोलनाचे रणशिंग फुंकले. महात्मा बसवण्णा आणि महिला सबलीकरण हा एक स्वतंत्र अध्ययनाचा विषय आहे. महिला सबलीकरणाच्या सर्व आयामांना बसवण्णांनी सैध्दांतिक व व्यावहारिक स्तरावर मूर्तरुप दिले. इष्टलिंग, कायक,



Scanned by CamScanner

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded



दासोह, अनुभवमंटप, शरण, जंगम व अरिवे (ज्ञान) गुरु या सर्व संकल्पनांना महिलांनी शाश्वत रुप दिले. महिलांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, वैचारिक, अध्यात्मिक, अधिकार व स्वातंत्र्याचे युग म्हणून बसवण्णांच्या कल्याण व मंगळवेढा नगराकडे पाहिले जाते. बसवण्णानंतर संत कबीराने आपल्या दोह्यातून स्त्रीयांच्या सामाजिक व धार्मिक विवंचनेचे वास्तव रुप मांडले. मोगल साम्राज्यात ब्राह्मणी विचारधारेने आपल्या सामाजिक व धार्मिक व्यवस्थेचे संरक्षण व्हावे म्हणून सतीप्रथा, विधवा शोषण, बाल-विवाह, बहु विवाह ई. सामाजिक कुरीतींचा विकास केला. ज्याच्या साह्याने स्त्रीयांना गुलामीचे जीवन व्यतित करण्यासाठी मजबूर केले. परिणामतः महिला पूर्णतः पुरुषांवर अवलंबून होत्या. पिता, पुत्र आणि पतीच्या भुमिकेतून पुरुषांकडे स्त्रीयांच्या संरक्षणाची जबाबदारी आली. ज्याचे निर्वाहण पुरुष करत असत. अशाप्रकारे मानवी समाजाच्या विकासात स्त्री समाज शोषण, गुलामी व विषमतेच्या मायाजालात फसत गेला.

आधुनिक युगात भांडवलशाही, वसाहतवाद आणि साम्राज्यवादी ई. शोषणावर आधारित व्यवस्थांचा विकास झाला. या व्यवस्थेत सरंजामशाही, ब्राह्मण्यवाद आणि पितृसत्ताक ई. व्यवस्था अधिक प्रभावी होत आहेत. त्यामुळे स्त्रियांचे शोषण वाढत आहे. संपूर्ण समाजात महिलांना पितृसत्ताकतेच्या ओझ्याखाली जिवन व्यतित करावे लागते. परंतू दलित महिलांना आपल्या समाजातील पितृसत्ताकतेच्या ओझ्यासह सवर्ण समाजातील पितृसत्ताकतेच्या शोषणास सहन करावे लागते. या दलित महिला दलितात ही दलित होत्या. स्त्रीयांच्या शारिरीक कोमलतेला दुर्बलता समजण्यात आले. स्त्रीच्या सौंदर्यास पुरुषांच्या उपयोगी श्रृंगार माणुन प्रस्तुत करण्यात आले. स्त्रीला गृहस्वामिनींच्या भूमिकेत हाऊसवाइफ सांगुन आर्थिक अधिकारापासून वंचित ठेवले. परिणामतः स्त्रीला अधिकाधिक मुलांना जन्म देवून आपल्या सौंदर्यास नष्ट करणारी व शारिरीक दुर्बलतेमुळे वृध्दापकाळाच्या दिशेने लवकरात लवकर जाणारी स्त्री म्हणून प्रकट करण्यात आले. कुटूंब व समाजाने स्त्रीचे सौंदर्य, आरोग्य व संपत्तीचे हरन केले. मानवी इतिहासाच्या परिक्रमेत ती वडिलांवर ओझे, नवऱ्याच्या मनोरंजनाचे साधन व सुनेच्या उपहासाचे पात्र बनुन राहिली. अशाप्रकारे इतिहासाच्या जडणघडणीच्या विकास यात्रेत स्त्रीयांच्या जगण्याचा एकमात्र आधार पुरुषांची कृपा बनला. ती अलगाव व अपमानाच्या स्थितीत खेचली गेली. ब्राह्मण्यवादी धार्मिक प्रतिबंधांनी व अंधश्रध्दांनी असहाय्य अक्षम पराजित व भाग्यवादी बनुन राहिली. अधिकारासाठी लढण्याऐवजी ती अधिकाराविषयी विचार करण्याच्या क्षमतेपासून वंचित बनली. ती आशा युगात जगत आहे, ज्यात तिच्याविषयीच्या आस्था लुप्त झाल्या.

भारतीय स्त्रीला अशा नरकासमान यातनेतून मुक्त करण्याचे आंदोलन गौतम बुध्दाच्याही अगोदरपासून चालु झाले. परंतू आधुनिक युगात त्याची तीव्रता अधिक वाढली. राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले ई. भारतीयांनी वेगवेगळ्या संघटनातून समाज सुधारणेच्या आंदोलनातून स्त्रीयांच्या स्वातंत्र्य आंदोलनाला दिशा दिली. राजाराम मोहन रॉयने १८२९ मध्ये सतीप्रथेवर प्रतिबंध लावणारा कायदा पास केला. आचार्य केशव चंद्रसेनने १८५६ मध्ये विधवा पुर्नविवाह कायदा पास केला. तसेच १८७२ मध्ये बालविवाह प्रतिबंध अधिनियम पारित केले. समाज सुधारणेचे हे आंदोलन भारतातील नव्या मानवतावादी युगाच्या जन्माचे आंदोलन होते. त्या प्रवाहासोबत युरोपीय विचार भारतात आले. तर या देशातील अनेक प्राचीन विचारांना नव्याने मांडण्यात आले. आधुनिक भारताचे सामाजिक व सांस्कृतिक प्रणेते म्हणून महात्मा ज्योतीबा फुल्यांनी स्त्रि शिक्षणाची चळवळ चालवली. त्यांच्या मते नारी सुशिक्षित झाल्यानंतरच सक्षम होवून चिंतन, मनन व लेखनाच्या माध्यमातून आपल्या अधिकारासाठी पुढे येईल. त्यांनी सनातन्यांच्या स्त्रीसंबंधी बंधनांना आव्हान देवून गावागावात अनेक स्त्री विद्यालय स्थापन केले. या कार्यात त्यांची पत्नी सावित्रीबाई फुल्यांनी त्यांना विशेष सहकार्य केले. सावित्रीबाईंच्या मते शिक्षणच स्त्रीयांच्या प्रगतीचे मुख्य साधन आहे. पेरियार ई.वी. रामास्वामींनी पण महिलांच्या शिक्षणावर जोर दिला. १९२८ साली त्यांनी आत्मसन्मान विवाह पध्दती सुरु केली. ज्यात स्त्री-पुरुषांच्या तलाक आणि संपत्ती संबंधीच्या अधिकारावर अधिक भर दिला. महिला पुरुषांच्या समान आहेत. गुलाम नाहीत हे सांगितले. स्त्रीयांना खरा मित्र मानावे. या सर्व समाज सुधारकांनी स्त्री जातीस स्वातंत्र्य व समताधिष्ठित बनवण्याचे अभियान चालवले. १९०७ मध्ये जेंव्हा भारताचे राष्ट्रवादी नेते लाला लजपत रायांना ब्रिटीश शासनाने अटक केली तेंव्हा त्यांचा विरोध करताना भारतीय स्त्री भीकाजी कामाने पॅरिसच्या भाषणात भारतीयांनी इंग्रजांचा बहिष्कार करावा असे सांगितले. वर्तमानकाळात जर स्त्री गुलामीत जगत असेल तर इतिहासातील स्वर्णयुगाचा उपयोग व महत्व काय. भारतीयांनी गुलामीतून बाहेर येवून स्वराज्याअंतर्गत स्वातंत्र्य व समतेची स्थापना करावी. १९२० पासून महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचे आंदोलन सुरु झाले. त्यात समाजसुधारणेलाही अधिक महत्व देण्यात आले. महात्मा गांधीनुसार स्त्रीयांना अबला मानने. त्यांचा अपमान करण्यासारखे आहे. त्यांच्यामते शक्ति म्हणजे नैतिक शक्ती असेल तर निश्चितच स्त्री पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे. तर अहिंसा मानव जातीशी संबंधित विषय असेल तर भविष्य स्त्रिजातीचे आहे. स्त्रियांत पुरुषांच्या तुलनेत अधिक आत्मत्याग, सहिष्णूता व धैर्य असते. जर पुरुषाने



Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE EDUCATION SOCIETY DEGLOOR



अविवेकपूर्ण साहसाने महिलांचे शोषण व अत्याचार केला नसता, स्त्री जर कामवासनेतून आनंद देण्याच्या प्रवृत्तीची नसती तर तिने जगाला आपल्यात निहित असलेल्या शक्तिंचा परिचय दिला असता. जेंव्हा स्त्रिस पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळेल किंवा ती परस्पर सहकार्य व संबंधाच्या शक्तिंचा वापर करू लागली तर जग पुन्हा एकदा स्त्री शक्तिची विलक्षणता व गौरवाने परिचीत होईल. महात्मा गांधीच्यामते दुसऱ्याच्या तपश्चर्येने आपण स्वर्गात जावू शकत नाही तसेच पुरुषांच्या विश्वासाने स्त्री समाजाची प्रगती होवू शकत नाही. कोणतीही व्यक्ति किंवा जात आपल्या शक्तीनेच प्रगती करु शकते. स्त्रीच्या मदतीस जोपर्यंत स्त्रीया येणार नाहीत तोपर्यंत स्त्री जातीचे कल्याण होणार नाही. महात्मा गांधीचा प्रभाव व आव्हानानेच स्वातंत्र्य चळवळीत समाजाच्या सर्व रुढिवादी बंधनाना तोडुन महिला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सहभागी झाल्या. भारतातील अनेक समाजसुधारक व गांधीच्या प्रयत्नामुळेच १९१७ ला विमेन्स इंडिया असोसिएशन, १९२५ ला नॅशनल काऊन्सिल फॉर विमेन्स इन इंडिया आणि १९२७ ला ऑल इंडिया विमेन्स कॉन्फ्रन्सची स्थापना झाली. भारतात महिला समाजातील जागरुकतेमुळेच १९२० ला मद्रास आणि १९२४ ला महाराष्ट्रातील महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. १९२७ ला शैक्षणिक सुधारणेवर पहिले महिला संम्मेलन झाले. ज्यात महाराणी, शिक्षणतज्ञ, डॉक्टर, वकील व गृहिणी महिलांनी सहभाग घेतला. येथुनच भारतात स्त्री सुधारणेबाबत आधुनिकतेच्या युगाचा प्रारंभ झाला. ज्याने भारतीय महिला चळवळीस जगातील इतर देशापेक्षा वेगळी ओळख दिली.

१९३५ चा भारत शासन कायदा पास झाल्यावेळी सहा लाख महिलांना मतदानाचा अधिकार होता. १९३७ ला झालेल्या निवडणुकीत १० स्त्रीया सामान्य मतदारसंघ आणि ४१ स्त्रीया आरक्षित मतदार संघातून निवडून आल्या. यासर्व परिस्थितीने महिलांसाठी राजकीय व सामाजिक सहभागित्वाची पोषक पार्श्वभूमी तयार केली. राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनात स्वतंत्र भारतासाठी स्वतंत्र संविधान असावे, जे भारतीयांनी बनवलेले असावे. भारतीय संविधान बनवण्यासाठी गठीत झालेल्या संविधान सभेत १४ स्त्रीया होत्या. संविधान सभेद्वारे जे संविधान बनवले त्यात महिलांना फक्त समानता न देता राज्यांना महिलांच्या बाजूने सकारात्मक उपाय स्विकारण्याची शक्ति दिली. संविधानाच्या उद्देशपत्रिकेतील वचनबध्दता आम्ही भारताचे लोक भारतास एक संपूर्ण सार्वभौम संपन्न लोकशाही गणराज्य बनवण्यासाठी आणि त्यांच्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार अभिव्यक्ति, विश्वास, धर्म आणि उपासनेचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व संधीची समानता प्राप्त करण्यासाठी तसेच त्यात व्यक्तिंची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता सुनिश्चित करणारी बंधुता वाढविण्यासाठी दृढ संकल्प करुन या संविधानास स्वीकारित, अधिनियमित व आत्मसमर्पित करत आहोत. देशाच्या राज्यघटनेत विभिन्न कायदेशीर तरतूदी शासकीय व अशासकीय संघटना आणि व्यक्तिगत व सामुहिक प्रयत्न महिला समाजास शक्ती संपन्न बनवण्यासाठी एकवटलेले आहेत. तरीही महिलांचे पूर्ण सबलीकरण होत नाही. संविधानातील मुलभुत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे आणि विशेषत्वाने कलम १४, १५, १६ व २३ मध्ये स्त्री समूहास समता व शोषणाविरुध्द अधिकार देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले दिशा-निर्देश, निर्णय व पंचवार्षिक योजना आणि महिला संघटनामार्फत आयोजित विभिन्न राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संम्मेलनामार्फत समाज आणि स्वत: महिलांना पण त्यांच्या अधिकाराविषयी परिचित केले.

निवडणूका ही एक लोकशाहीत्मक प्रक्रिया आहे. ज्यात स्त्री आणि पुरुष समान रुपाने सहभागित्व देतात. परंतू स्वतंत्र भारतातील निवडणूकीच्या राजकारणास जेंव्हापासून प्रारंभ झाला, तेंव्हापासून ती नेहमी नवसरंजामवादी स्वरुप धारण करताना दिसते. प्रत्येक निवडणूकीत जात,धर्म, वर्गासह धन आणि शक्तीच्या वापराचे महत्व वाढत आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीची भुमिका महत्वपूर्ण बनत आहे. स्त्रिसमूह भारतीय राजकारणाच्या नवसरंजामवादी व्यवस्थेच्या उंबरठ्यावर उभा टाकला आहे. लोकशाही शासन व्यवस्था संचलनाच्या पहिल्या टप्यात महिला पडदा पध्दती व पुरुषप्रधान मानसिकतेमुळे राजकीय सहभागित्व देण्यास असमर्थ राहिल्या. निवडणूकीच्या माध्यमातून व प्रतिनिधीत्वाच्या साह्याने सत्तेतील भागीदारीच्या सोबतीने भारतीय समाजाच्या राजनितीकरणाच्या प्रक्रियेचा प्रारंभ झाला. ज्यात पुरुष समुहाचे राजकीयीकरण झाले. पुरुष समुहाचा राजकीय विकास झाला. परंतु महिला समूहाचे राजकीयीकरण व राजकीय विकास झाला नाही. लोकशाहीच्या विकासासोबत समाजाच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थितीत बदल झाला. परंतू स्त्री समूहाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीत बदल झाला नाही. जर एखाद्या ठिकाणी स्त्री समुहांच्या स्थितीत बदल दिसून येत असेल तर तो पुरुषांनी ठरवून दिलेल्या प्रमाणातच झाला. लोकशाही विकासासोबत भारतीय पुरुषांचे लोकशाहीकरण झाले स्त्री समाजाचे नाही. भारतीय समाजातील विभिन्न वर्ग, जाती व धर्मांच्या पुरुषांनी आपले अधिकार, सुविधा व सत्तांत भागीदारी मिळवण्यासाठी आपले संघटन बनवले. त्यासाठी आंदोलन केले. परंतू स्त्री समाज अद्याप संघटीत झाला नाही. त्याने सर्वसमावेशक आंदोलन ही केले नाही. पुरुषांनी आपल्या संघटनाचे नेतृत्व विकसित केले आणि त्या नेतृत्वाच्या निर्देशनात



Scanned by CamScanner

आपल्या हितांच्या रक्षणासाठी संघष केला. पडदा पध्दती, पुरुषधार्जिणी परंपरा आणि पुरुषप्रधान समाजातील कुटूंबव्यवस्थेतून पुरुषांनी महिलांना घरातून बाहेर जावू दिले नाही. सार्वजनिक जीवनात सहभागी होवू दिले नाही. सार्वजनिक कार्यक्रमात सहभागित्व होण्याची संधी दिली नाही. याच कारणांमुळे स्वातंत्र्य मिळून व लोकशाही व्यवस्थेच्या सक्रियतेतही स्त्री समुह आपल्या जीवनात संविधानाद्वारा मिळालेले अधिकार व सुविधांचा वापर करून सामाजिक जीवनात स्वत:ची ओळख बनवु शकला नाही. त्यांचे संपूर्ण जीवन व वेळ पती आणि कुटूंबातच व्यस्त राहिला.

पंचवार्षीक योजनांच्या माध्यमातून महिलांसाठी ज्या कल्याणकारी विकास योजना बनवल्या त्यातून महिलांना फायदा झाला नाही. महिला आत्मनिर्भर झाल्या नाहीत. महिलांना त्या योजनांचा लाभ तेंव्हाच मिळेल जेंव्हा त्यांच्या कुटूंबातील पुरुष त्यात लक्ष देतील. त्यांना फायदा तेवढाच मिळाला जेवढा त्यांच्या कुटूंबानी स्विकारला. शासनाच्या साह्याने, पुरुषवर्गाच्या मदतीने व विकास योजना मार्फत महिलांच्या स्थितीत जे परिवर्तन झाले, त्यामुळे त्यांना भुक आणि अज्ञानापासून मुक्तता मिळाली. परंतु शोषण, परावलंबन आणि गुलामीपासून सुटका झाली नाही. जे महिला सबलीकरणासाठी सर्वाधिक अनिवार्य आहे.

भारतीय महिलांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी व त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी जुन्या अधिनियमात संशोधन करण्यात आले. नवे अधिनियम बनवले गेले हिंदू विवाह अधिनियम १९५५, विशेष विवाह अधिनियम १९५४ चे विधी संशोधन अधिनियम १९७६ च्या दुरुस्तीमुळे जिचा बाल्यावस्थेत विवाह झाला तीला प्रौढ होण्यापूर्वी त्या विवाहास नाकारण्याचा अधिकार दिला. आपसी सहमतीच्या आधारावर विवाह विच्छेदन सिध्दांताला मान्य करण्यात आले. क्रुरता आणि असहकार्यास विवाह विच्छेदनाच्या आधारावर स्विकारण्यात आले. अनैतिक निवारक अधिनियम १९८६ च्या माध्यमातून वेश्या व्यवसाया संबंधी कठोर व प्रभावी कायदा बनवला. ज्यामुळे स्त्री किंवा पुरुष अशा सर्व व्यक्तिंना सहभागी करता येईल. जे अनैतिक कार्यासाठी महिला किंवा मुलींचे शोषण करतात. ३ जानेवारी १९९२ ला राष्ट्रीय महिला आयोग गठित झाला. ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा केला जातो. भारत शासनामार्फत २००१ ला महिला सबलीकरण वर्ष घोषित केले. स्वंयसिध्द योजना, महिला समरसता कार्यक्रम ई. योजना चालू केल्या. या सर्व प्रयत्नानंतरही स्त्री समाजाची दशा खालावलेलीच आहे. व्यावहारिक जीवनात त्यांना स्वातंत्र्य व समता दोन्ही मिळाले नाही.

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीनंतर ४२ वर्षांनी ७३ व ७४ व्या घटनादुरुस्ती माध्यमतून शासनाने महिला सबलीकरणासाठी प्रथमच एक क्रांतीकारी पाउल उचलले. या घटनादुरुस्तीने प्रथम स्त्री समूहास घराची चौकट ओलांडून बाहेर येवून समाजात सहभागित्व देण्यासाठी संधीच दिली नाही तर विवश केले. प्रारंभीच्या काळात स्त्री मुक्तीच्या अभियानास महिला सबलीकरणाच्या अभियानात परावर्तीत केले. ज्या महिला पुरुषांच्या त्रासाने ग्रासलेल्या आहेत. पडदा पध्दती व चार भिंतीत बंद व अज्ञानाने घेरलेल्या आहेत. अनेक असांस्कृतिक उपमांमार्फत अपमानीत होत्या. त्या आता खुल्या आकाशात मोकळा श्वास घेत आहेत. आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी स्वतंत्ररित्या आपल्या भुमिकांचे निर्धारण करत आहेत. विषमतेपासून समानतेच्या दिशेने अग्रेसर होत आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीने प्रत्यक्ष लोकशाहीच्या युगास जन्म दिला. पंचायतराज आज महिलांच्या राजकीय विकासाची पाठशाळा म्हणून विकसित होत आहेत. महिलांच्या राजकीय सहभागास संस्थात्मक स्वरुप प्राप्त केले. ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार गाव, तालुका, जिल्हा, स्तरावरील प्रत्येक पंचायतीत नियमितपणे पाच वर्षांनी निवडणूका होतील. पंचायत राज संस्थांमध्ये अनुसूचित जाती व जमातींच्या संख्येनूसार आरक्षण दिले जाते. संपूर्ण जागेतील १/३ जागा महिलांसाठी आरक्षित असणे हा फार क्रांतीकारी निर्णय आहे. प्रारंभीच्या काळात गावातील अभिजनांनी आपली मुलगी, बहिण व पाहुण्यातील स्त्रिला निवडणुकीत तिकीट देवून त्यांना आपल्या तालावर नाचवले. परंतु एकदा सत्तेचा भाग बनलेल्या महिला व सरपंच महिलांनी स्त्रियांनी संबंधित मुद्दे व तसेच सार्वजनिक विकास कार्याशी संबंधित बाबीत आवडीने सहभाग घेतला. त्यामुळे ग्रामीण परिसर व लोकांच्या सामाजीकरणात बदल झाला. ज्या संस्था पूर्वी समाजातील प्रभुत्ववादी वर्गाच्या इच्छा व आकांक्षांच्या पुर्ततेचे साधन बनले होते. ते आता खऱ्या अर्थाने ग्रामीण स्वराज्य व विकासाचे घटक बनले. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायती संस्थांच्या स्वरुप व कार्यप्रणालीत तर बदल झालाच तसेच संरचना व कार्यकुशलतेतही क्रांतीकारी बदल झाला. पंचायतीत निर्वाचित महिला पंचाची संख्या ३३% चा आकडा पार करुन ४०% पर्यंत पोहोचली. ज्या ठिकाणी पूर्वी महिला सरपंच, उपसरपंच व सदस्य दिवा घेवून शोधल्यानेही मिळत नसत. आता त्या ग्रामीण महिला नेता बनल्या. आपली कर्तव्य-निष्ठता, निष्ठा व निपक्षपातीपणामुळे पंचायत राज व्यवस्थेच्या इतिहासाचे सुवर्णाक्षर बनत आहेत.

पंचायती राज व्यवस्थेच्या एका समीक्षणानुसार प्रारंभी महिला आरक्षण आणि त्यांची निवड हा विनोदाचा विषय बनला. महिलांना पुरुषांची कठपुतली समजण्यात आले. परंतू आज महिलांना व एकंदरीत समाजाला त्यांच्या क्षमतांची जाणीव झाली. कांही करण्याची व समाजात आपली ओळख बनवण्याच्या इच्छेने त्या



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

निवडणूका लढवत आहेत. यात अनुसूचित जाती व जमातींच्या महिलांही अग्रेसर आहेत. हरियाणातील एका पंचायतीत सर्व सभासद व पदावर महिला आहेत. सत्तेतील महिलांचीही भागीदारी फक्त संख्या व प्रमाणापर्यंतच मर्यादित नाही. पंचायतीत ग्रामीण महिलांची उपस्थिती त्यांचा आत्मविश्वास वाढवते. चुल आणि मुल यासोबतच गाव आणि समाजासाठी विकासाचे प्रत्येक कार्य करण्याची क्षमता स्वतः असल्याची जाणीव महिलांना झाली. ७३ व्या घटनादुरुस्तीने पुरुषप्रधान व्यवस्थेत तशी संधी महिलांना दिली. आज पंचायतीतील महिला प्रतिनिधी पंचायतीचे अंदाजपत्रक तयार करत आहेत. अंदाजपत्रकात महिलांशी संबंधित कार्याला अधिक महत्व देत आहेत. वास्तवतेत कोणी स्वप्नातही विचार केला नव्हता की, पंचायतीतील महिला आरक्षण त्यांच्या सबलीकरण आणि ग्रामीण समाजाच्या बहुमुखी विकासाच्या शक्यतांचे प्रवेशद्वारे खोलणारे ठरले.

परंतू पंचायत व्यवस्थेत महिलांना आरक्षण देवून आम्ही महिलांत राष्ट्रीय स्तराची जागरुकता उत्पन्न करू शकत नाहीत. तसेच सबलीकरणास पूर्णता प्राप्त होत नाही. यासाठी आवश्यक आहे की, विधानसभा व संसदेत ही आरक्षणाच्या माध्यमातून महिलांचे प्रतिनिधीत्व निश्चित करावे लागेल. तसेच महिलांत प्रांतीय व राष्ट्रीय स्तराचे नेतृत्व विकसित करणे गरजेचे आहे.

राज्यघटना निर्माण करताना घटना समितीत, अनुसूचित जाती व जमाती शिवाय महिलांना आरक्षण देण्याची मागणी उठत आहे. परंतू महिला लोकप्रतिनिधींनी त्यास आम्ही स्वतः निवडणुक लढवू व त्या जिंकून आपले स्थान प्राप्त करु असे म्हणून रोखले. राजीव गांधीने महिलांच्या प्रतिनिधीत्वास पंचायती सोबत लोकसभा व विधानसभेत सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. इ.स.२००० पर्यंतच्या राष्ट्रीय परिदृश्यानूसार त्यांचा समावेश करु इच्छित होते. परंतू महिला संघटनांनी त्यास अमान्य केले. बदलत्या काळानूसार निवडणूकांचे राजकारण नव्या सरंजामवादी व्यवस्थेत फसत गेले. तसेच ते महिला विरोधी बनले. भारताच्या निवडणूकी राजकारणातील नव सामंतवादी व्यवस्थेत पुरुषांचे हितसंवर्धन ज्यात तेथेच महिलांना स्थान होते. त्यामुळेच महिला पत्नी, प्रेमिका, बहीण, मुलगी व वहिणीच्या रुपाने लोक प्रतिनिधी म्हणून पुढे आल्या. परंतू सामान्य महिलेच्या रुपात व महिला हिताची संरक्षक म्हणून तिला या लोकशाही संस्थापर्यंत जाता आले नाही. त्यांच्या प्रतिनिधीत्वाचे प्रयोजन फक्त कुटूंब व नफ्याचे हित ना की महिलांचे हित.

भारतीय राजकारणातील यशस्वी महिला राजकारण्यात अधिकतर तिचं नाव पुढे येतात, ज्यांचा कोणत्या ना कोणत्या राजकीय घराण्यांशी संबंध आहे. मग त्या इंदिरा गांधी, सोनिया गांधी, वसुंधराराजे सिंधीया, शीला दिक्षित, रीता बहुगुणा जोशी, मीरा कुमारी, प्रतिभाताई पाटील ई. राजकीय घराण्याचा वारसा नसताना ज्यांनी सफल राजकारणी म्हणून आपला ठसा उमटवला त्यातील बऱ्याचजणींसाठी कोणत्या ना कोणत्या राजकीय नेत्याने गॉडफादरची भूमिका बजावली. मायावतीस काशीरामने आपला वारसदार मानले. जयललितास एम.जी.रामचंद्रने राजकारणात यशस्वी केले. जयाप्रदास अमरसिंहानी साथ दिली. अनुराधा चौधरीस अजीत सिंहांनी सदैव समर्थन दिले. सुषमा स्वराजला प्रारंभापासूनच बंसीलालनी मदत केली. प्रत्यक्ष ग्राऊंड लेवलवर काम करुन राष्ट्रीय राजकारणाच्या पटलावर आपली ओळख बनवणाऱ्या महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे. भारतीय राजकारणात १९९० च्या दशकांत महिला आरक्षणाच्या मुद्यावर झालेल्या चर्चेत शरद यादवांनी आक्षेपार्ह विधान केले. मुरली मनोहर जोशी व लालमुनि चौबेंनी महिला आरक्षणास संसदीय खुर्चीची बर्बादी मानले. इतर मागास जातीचे नेते या मुद्यांवर पूर्वग्रह दुषित मानसिकतेने ग्रासलेले आहेत. यावरुन एक बाब स्पष्ट होते की, राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षातील नेते महिलांना सत्तेत समान भागीदारी देवू इच्छित नाहीत. राजकारण असो किंवा समाजकारण महिलांना देवी या उपाधीने सजवण्यात आले. परंतू जेंव्हा सत्ता देण्याचा प्रश्न येतो तेंव्हा हाच समाज आपले पाऊल मागे ओढतो. १९९६ ला जेंव्हा पहिल्यांदा महिला आरक्षण विधेयक लोकसभेत चर्चेसाठी आले त्यावेळेस उमा भारतींनी इतर मागास वर्गातील महिलांना राखीव कोट्याअंतर्गत एक राखीव कोटा द्यावी हा मुद्या मांडला. त्यामुळे ते विधेयक संयुक्त समितीच्या विचारार्थ पाठवण्यात आले. आजपर्यंत हे विधेयक अनेक वादविवादात फसले. यामुळे एका महिला लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून सर्व राजकीय पक्षातील पुरुष लोकप्रतिनिधींची हे बिल पास न होण्याची इच्छा पूर्ण झाली.

२००४ च्या पहिल्या यु.पी.ए.शासनाने महिलांच्या आरक्षणाचे विधेयक पास करण्याचे वचन दिले. परंतू जेंव्हा राज्यसभेत सोनिया गांधीच्या प्रयत्नाने हे महिला आरक्षण विधेयक मांडण्यात आले तेव्हा यु.पी.ए.चे सहकारी पक्ष राष्ट्रीय जनता दल, जनता दल यूनायटेड आणि समाजवादी पक्षांनी महिला आरक्षणास तीव्र विरोध केला. परंतू दुसऱ्यांदा जेंव्हा विधेयक २००८ राज्यसभेकडून पास करुन घेतले. या विधेयकाला विरोध करणारे सपा, राजद आणि तृणमुल कॉंग्रेस हे त्यांचे सहकारी पक्ष होते. ज्यांचे समर्थन सोनिया गांधीला अर्थविधेयक पास करण्यासाठी हवे होते. त्यामुळे त्यांच्या विरोधात कोणती भूमिका घेण्याच्या मूडमध्ये सोनिया गांधी नव्हत्या. तरीही सोनिया गांधीच्या सहमतीने राज्यसभेत गोंधळ घालणाऱ्या सपा, राजदच्या सात संसद सभासदांना मार्शलच्या मदतीने बाहेर करुन महिला आरक्षण विधेयकावर चर्चा घडवली आणि सायंकाळी १८० सदस्यांच्या स्वाक्षरीने हे विधेयक राज्यसभेने मंजूर केले.



Scanned by CamScanner

अशाप्रकारे साम्यवादी पक्षांच्या मदतीने या क्रांतीकारी सामाजिक, राजकीय बदल घडवणाऱ्या ऐतिहासिक विधेयकास राज्यसभेने मान्यता दिली. या विधेयकाच्या मंजूरीसाठी काँग्रेस व भाजपा शासनाने व्हिप जारी केला. नेतृत्वाच्या दबावानेही एखादे विधेयक पास होवू शकते हे याचे उत्तम उदाहरण आहे. सर्व सभासद महिलांच्या राजकीय सहभागास किंवा सत्तेतील आपला वाटा स्त्रियांना देण्यास तयार नाहीत. अशास्थितीत वर्तमानातील शासनाकडून महिला आरक्षणाबाबत न्यायाची अपेक्षा करणे चुकीचे आहे. सर्व शासक वर्ग आणि सर्वच राजकीय पक्षांची पितृसत्ताक शासन व्यवस्थेवर दृढ श्रध्दा आहे. त्यामुळे राजकीय पक्षांत महिलांनी आपले स्थान बनवणे आवश्यक आहे. कारण राजकीय पक्ष पुरुषांची व्यक्तिगत संपत्ती नाही. महिलांना राजकीय पक्षात प्रवेश करून आपला आवाज पक्षांतर्गतग व पक्षाबाहेरही आपला आवाज प्रभावी बनवावा. पक्षाबाहेरही महिलांनी स्वतःशी संबंधित व इतर विषयाला प्राधान्याने मांडावे. ज्या विषयांना स्वार्थी राजकारण पक्षांतर्गत मांडत नाही. भारतीय महिलांत जातीय विचारसरणीचे असणे ही एक विडंबनाच आहे. परंतू महिलावादी विचारसरणी प्रभावी नाही. त्यामुळेच निवडणूकीत महिला मतदारांची संख्या बरीच असूनही महिला उमेदवार निवडणूकीत पराभूत होतात. जर आम्हाला महिला सबलीकरणाच्या सिध्दांतास व्यावहारिक रुप द्यायचे असेल तर महिला विरोधी नवसरंजामवादी सांप्रदायिक आणि पितृसत्ताक समाज संरचनेवर आक्रमण करावे लागेल. महिला विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेतील समान सुत्रधार होवू शकत नाहीत या विचारधारा व राजकीय संस्कृती विरोधात आणि त्यास वृध्दिंगत करणाऱ्या मानसिकतेत बदल करण्यासाठी स्वतंत्र अभियान राबवावे लागेल. महिलांना कुटूंब, कुळ, खानदानाची संपत्ती मानले जाते. त्यांना समतेचा अधिकार दिला नाही. त्यांचा सामाजिक, आर्थिक आवाज दावला जातो. तशी मागणी करणाऱ्या स्त्रिस बहिष्कृत करुन समाज धर्मद्रोही समजतात. महिलांची अस्मिता व स्थितीसोबत खेळणाऱ्या प्रवृत्ती व शक्तिविरुध्दचा चळवळीस व्यापक बनवावे लागेल.

आज २१ व्या शतकात बऱ्याच महिला स्वतंत्ररित्या आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करतात. स्वतंत्ररित्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रमात, उपक्रमात आपले योगदान देवू इच्छितात. त्यांच्यापुढे दोनच पर्याय आहेत एक त्यांनी स्वतःला कौटुंबिक व परंपरेच्या मर्यादानुरुप बनवावे, दुसरे आपल्या अधिकाराविषयी स्वतंत्ररित्या विचार करुन कुटूंबाचा त्याग करुन स्वतंत्रपणे आपल्या सहभागाविषयी निर्णय घ्यावा. आपले अधिकार व स्वातंत्र्याची मागणी सोडल्याने कुटूंबाचे सहकार्य मिळते. जे आजच्या सामाजिक असुरक्षिततेच्या वातावरणात गरजेचे आहे. जर कुटूंब सोडले तर तीचे जीवन आणि प्रतिष्ठा असुरक्षिततेच्या गर्तेत फसत जाते. जे तिच्या सामाजिक व राजकीय भविष्याच्या दृष्टीने योग्य नाही. समाजात तिची बदनामी होते. तिच्या चारित्र्याविषयी शंका घेवून नको त्या आरोपांचा व मनस्तापाचा तिला सामना करावा लागतो. अशा द्विधा मनस्थितीतून तिची सुटका करण्यासाठी तिस जात, धर्म व वर्गाच्या राजकारपासून स्वतंत्र करावे. स्त्रिला स्त्रीविरोधी नवसरंजामवादी संरचनेच्या साखळदंडातून बाहेर पडून लोकशाही प्रक्रियेत सहभागी करावे. आमच्या पितृसत्ताक समाजात एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून तिच्याकडे न पाहता सदैव कुटूंब, जात व धर्मासोबत जोडूनच चिंतन केले जाते. यामुळेच ती कुटूंब, जात व धर्मांची अब्रु लुटण्याच्या प्रक्रियेचे माध्यम बनते. नव सरंजामी पितृसत्ताक संरचनेची बंधने आणि या व्यवस्थेस मजबूत करण्यासाठी प्रयत्नरत असणारे राजकारण, नोकरशाही, पोलिस प्रशासन, धर्मव्यवस्था या सर्वांनी देशातील १/४ महिलांना शारिरीक शोषण, अत्याचार, अज्ञान, गुलामीत जगण्यासाठी मजबूर केले.

भारतात महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेला प्रभावी बनवण्यासाठी त्याच्या सामाजिक जीवनाशी संबंधीत रुढीवादी सिध्दांताला नष्ट करावे व त्यात बदल घडवावा. महिला वर्गात सामाजिक बदलाप्रती आवड व उत्साह उत्पन्न करावा. तिला स्वावलंबी व आत्मनिर्भर बनवण्यासोबतच सत्तेतील वाटा द्यावा लागेल. लोकशाही मूल्य व घटनात्मक अधिकाराप्रति त्यांना जागरुक बनवणे गरजेचे आहे. अंधश्रध्दा व धार्मिक कर्मकांडाच्या बंधनातून मुक्त करावे.

संदर्भ ग्रंथ :

१) महिला सक्षमीकरण : स्वरुप आणि विकास, संपादक-प्रा.पांडुरंग मुळे, अरुणा प्रकाशन, लातूर-२०१६.

२) तिसऱ्या बिंदूच्या शोधात-डॉ.तारा भवाळकर, सुगावा प्रकाशन, पुणे-२००१.

३) फुले आंबेडकरी स्त्री चळवळ-मीनाक्षी मून, समता प्रकाशन, नागपूर,२०११.

४) स्त्रिया : समाज आणि राजकारण - डॉ.भारती पाटील, हर्मिस प्रकाशन, सातारा,२०१४.

५) लोकसभा निवडणूक विशेषांक-२०१४, विचारशलाका-संपादक-प्रा.नागोराव कुंभार-ऑगस्ट-२०१४ ते जानेवारी २०१५, लातूर.

६) निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही-डॉ.दिलीप सरवदे, डॉ.उदय निरगुडकर-राजहंस प्रकाशन, पुणे.

७) विचारशलाका-संपादक प्रा.नागोराव कुंभार, एप्रिल ते डिसेंबर-२०१६, लातूर.

८) महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय-प्रा.डॉ.रेखा हिंगोले (माने) इशा प्रकाशन, लातूर-२००६.

□□□



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner